# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,

## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


**२७) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०२.०६.२०२६**

**जिल्हा : अहिल्यानगर**

| मागील आठवड्यातील हवामान (२६/०५/२०२६ ते ०१/०६/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०३/०६/२०२६ ते ०७/०६/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ०१ | < दिनांक > | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ६.० | पाऊस (मिमी) | ९ | ८ | ७ | ५ | ४ |
| ३८.० | ३८.२ | ३८.८ | ३९.२ | ३९.६ | ३९.० | ३८.८ | कमाल तापमान (अंसे) | ३७ | ३८ | ३८ | ३९ | ३९ |
| १८.५ | १८.७ | १८.५ | १८.९ | १८.७ | १८.५ | १८.३ | किमान तापमान (अंसे) | २४ | २५ | २५ | २५ | २६ |
| १.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | २.० | ढग स्थिती (आकाश) | १ | १ | २ | ४ | ५ |
| ६८ | ६७ | ६९ | ६५ | ६७ | ६९ | ७८ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७२ | ७३ | ७५ | ७७ | ७७ |
| ३० | २९ | २८ | २६ | २७ | २९ | ३१ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २६ | २७ | ३१ | ३३ | ३३ |
| ३.२ | ३.१ | ३.२ | ३.० | २.९ | २.९ | ३.९ | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | १२ | १५ | १४ | १५ | १४ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार, **दि. ५ ते ७ जुन रोजी आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. तसेच पुढील पाच दिवस काही ठिकाणी मेघगर्जना व सोसाट्याच्या वा-यासह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| **सामान्य सल्ला** | | पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेली पिके सुरक्षीत ठिकाणी ठेवावीत किंवा प्लास्टिकच्या कागदाने झाकून ठेवावीत.<br>विजेचा पुर्वानुमान मिळणेकरीता दामिनी मोबाईल अपचा वापर करावा.<br>हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| **संदेश** | | **पुढील पाच दिवस काही ठिकाणी मेघगर्जना व सोसाट्याच्या वा-यासह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| **खरीप नियोजन** | | पूर्व मशागत झालेली असल्यास पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी मध्यम जमिनीत वाफे आणि भारी जमिनीत सरी वरंबे करावेत. खरीप हंगामात भाजीपाल्याची लागवड करण्यासाठी ज्याच्याकडे पाण्याची सुविधा आहे त्यांनी रोपे तयार करण्यासाठी रोपवाटीका तयार करावी. आपल्या शेतातील मातीचा नमुना त्यात अन्नद्रव्याचे प्रमाण, जमिनीचा आम्ल विम्ल निर्देशांक म्हणजेच सामू तपासून जामीनीबाबाताचे माहिती घेणे आवश्यक आहे. खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमाणित बियाण्याचे नियोजन करावे. |
| **पिकांची निवड** | **जमिनी नुसार** | **भारी:** कापूस, तूर, सोयाबीन<br>**मध्यम:** सूर्यफूल, तूर, बाजरी, सोयाबीन<br>**हलकी:** बाजरी, कुळीथ, तीळ, कारळा, एरंडी |
| **ऊस** | | हुमणी अळीच्या भुग्याचे नियंत्रण<br>हुमणी आळीच्या भुंग्याचा वावर हा प्रामुख्याने संध्याकाळी ६ ते ८ वाजेच्या दरम्यान असतो. त्याकरीता एकरी एक प्रकाश सापळा संध्याकाळी ६ ते ८ वाजेच्या दरम्यान लावावा. |
| **कापूस** | **पूर्वमशागत** | **जमीन:** मध्यम ते खोल व पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन<br>**पूर्वमशागत:** एक नांगरट, २ ते ३ कुळवाच्या पाळया देऊन जमीन भुसभूशीत करावी. |
| **सोयाबीन** | **पूर्वमशागत** | **जमीन:** मध्यम काळी पोयट्याची, चांगली निचरा होणारी.<br>**पूर्वमशागत:** एक नांगरट, दोन कुळवाच्या पाळया देऊन जमीन भुसभूशीत करावी. |
| **मूग व उडीद** | **पूर्वमशागत** | **जमीन:** मूग आणि उडीदाला मध्यम ते भारी, चांगली निचरा होणारी जमीन आवश्यक असते. पाणी साचून राहणारी क्षारपड, चोपण किंवा अत्यंत हलकी जमीन टाळावी.<br>**पूर्वमशागत:** चांगली पूर्वमशागत ही मूग आणि उडीदाच्या अधिक उत्पादनासाठी आवश्यक बाब आहे. यासाठी उन्हाळयापूर्वी जमीन नांगरावी. |
| **तूर** | **पूर्वमशागत** | **जमीन:** मध्यम ते भारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन तूर पिकाकरिता योग्य असते. चोपण, पाणथळ जमिनीत तूर चांगली येत नाही. कसदार, भुशभुशीत, पोयट्याच्या जमिनीत सुद्धा तूर चांगली येते. जमिनीत |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | स्फुरद, कॅल्शिअम, गंधक या द्रव्यांची कमतरता नसावी. साधारणत: ६.५ ते ७.५ सामू असलेली जमीन या पिकास योग्य असते.<br>**पूर्व मशागत:** एक नांगरट व दोन-तीन कुळवाच्या द्याव्यात. |
| **बाजरी** | **पेरणी पूर्व तयारी** | **जमीन :** बाजरी पिकासाठी पाण्याचा उत्तम निचरा होणारी हलकी ते मध्यम जमीन निवडावी. जमिनीचा सामु हा ६.२ ते ८ असावा. हलकया जमिनीत बाजरी हे पिक घ्यावयाचे असल्यास सरी-वरंबा पध्दत फायदेशीर ठरते.<br>**पूर्वमशागत:** जमिनीची १५ सें.मी. पर्यंत खोल नांगरट करावी. त्यानंतर कुळवाच्या दोन पाळया देऊन जमीन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणी अगोदर प्रती हेक्टरी ५ टन / १० ते १५ गाड्या शेणखत किंवा कंपोस्ट खत शेतात पसरावे. |
| **भुईमुग** | **पूर्वमशागत** | **जमीन:** मध्यम, भुसभुशीत, चुना व सेंद्रिय पदार्थ योग्य प्रमाणात असलेली व पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी.<br>**पूर्व मशागत:** एक नांगरट व दोन-तीन कुळवाच्या द्याव्यात. |
| **मका** | **पूर्वमशागत** | **जमीन:** मध्यम ते भारी, खोल, रेतीयुक्त, उत्तम नीचऱ्याची विशेषत: नदीकाठची गाळाची जमीन फारच उत्तम.<br>**पूर्वमशागत:** एक खोल नांगरट, २-३ कुळवाच्या पाळया देऊन २० ते २५ गाड्या प्रतीहेक्टरी शेणखत/ कंपोस्ट खत यांचवेळी शेतात मिसळून घ्यावे. हिरवळीचे खत गाडले असल्यास शेणखत/ कंपोस्ट खताची जरूरी नसते. |
| **पशूसंवर्धन** | | जनावरांच्या पिण्यात दूषित किंवा गाळ मिश्रण पाणी जाणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे जंत निर्मूलन करून घ्यावे. कोवळया गवतामुळे होणारी बुळकांडी रोगाकरिता सल्फा गोळयाचा वापर करावा.<br>जनावरांना उत्तम संतुलित आहार द्यावा. जनावरांचा गोठा स्वच्छ, कोरडा व हवेशीर ठेवणे व वेळोवेळी निर्जंतुकीकरण करणे महत्त्वाचे आहे. औषधे देतांना औषध योग्य मात्रेतच द्यावे.<br>जनावरांना मोकळया जागेत बांधू नये. त्यांना गोठा, शेड किंवा मजबूत इमारतीत ठेवावे. |
| **पाण्याचे पूर्नभरण** | | चर, विहीर, तलाव यामधील गाळ किंवा ते काढून घ्यावेत. तसेच पाणी जमिनीत जास्तीत मुरेल व वाहून जाणार नाही याचा प्रयत्न करावा. पावसाचे घराच्या छतावर पडणारे पाणी पाइपद्वारे एखाद्या टाकीत जमा करावे व त्याचा वापर विहिर पुर्नभरण किंवा बोअरवेल पूर्नभरण करुन घ्यावे. |

**स्त्रोत** :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.

दि. : ०२.०६.२०२६

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**